Azadi Ka Amrit Mahotsav

# स्वातंत्र्योत्तर भारत : आर्थिक आणि सामाजिक विकास




संपादक : डॉ. विलास खंदारे

स्वातंत्र्योत्तर भारत : आर्थिक आणि सामाजिक विकास

ISBN : 978-93-91220-89-1

© डॉ. विलास खंदारे

**संपादक**
**डॉ. विलास खंदारे**

**प्रकाशक**
**भारत जमधडे**
अपूर्व पब्लिशिंग हाऊस
बी-२/१५, सनी सेंटर, पिसादेवी रोड, औरंगाबाद (महा.)
मो. 9049591747, 8177803216
ईमेल : apoorvjamdhade@rediffmail.com
bharatjamdhade1976@gmail.com

आवृत्ती : २० सप्टेंबर २०२३

पेज सेंटीग
**यजुवेन्द्र वनकर**
मो. 9763830016

**कव्हर पेज**
निसर्ग प्रिंट, भारत बाजार, एम.आय.डी.सी. चिकलठाणा, औरंगाबाद

मूल्य :

टीप : या पुस्तकात प्रकाशित झालेल्या लेखासंदर्भातील मते स्वत: लेखकाचे असून त्यास संपादक, संपादक मंडळ तसेच प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.

32 औरंगाबाद जिल्ह्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांचा एक चिकित्सक अभ्यास
**डॉ. विश्वनाथ कोक्कर, शरदचंद्र आनंदराव आजबे**........................................ 130

33 कृषी विकास संदर्भात पंचायत राज मधील विविध विकास योजना
कु. सुजाता गिरधारी चव्हाण, डॉ.दिलीप मिसाळ........................................ 134

34 **भारतातील विदेशी पर्यटकांचे आगमन आणि पर्यटनापासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अभ्यास**
डॉ. पांडुरंग मारोतराव कल्याणकर, श्री. घाडगे राजेंद्र महादेव........................................ 138

35 भारतीय राजकारण व राजकीय विचारधारा. विशेष - संदर्भ महाराष्ट्र
**अमोल पांडुरंग गहिरे, प्रा.डॉ.उमाकांत बाबूराव राठोड**........................................ 142

36 महाराष्ट्रातील वातावरणातील बदलाचा परिणाम : दुष्काळ
**डॉ. विश्वनाथ कोक्कर, वर्षा विष्णु कनकुटे**........................................ 146

37 मराठवाड्यातील लघुउद्योजकांचा चिकित्सक अभ्यास : विशेष संदर्भ औरंगाबाद जिल्हा
**धम्मपाल किसन इंगोले, डॉ. संजय काशिनाथ मगर**........................................ 151

38 पीकविमाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता औरंगाबाद जिल्हा
विशेष संदर्भ खुलताबाद तालुका
**अमोल वसंतराव खंडागळे, डॉ. सुनिल अण्णा गोरडे**........................................ 157

39 नियतकालिके : साहित्य, समाज व संस्कृती
**डॉ. संतोष जाधव**........................................ 160

40 आर्थिक निशेष व सरकारचे धोरण
**तिगोटे राहुल शिवाजी, डॉ. दीपक भुसारे**........................................ 163

41 महाराष्ट्रातील शेकऱ्यांच्या समस्या
**डॉ. प्रा. विश्वनाथ कोक्कर, अमोल अशोकराव औटे**........................................ 168

42 सामाजिक आर्थिक विकासात शेतकरी उत्पादक कंपन्यांचा अभ्यास
**डॉ. प्रा. सोमेश्वर बाबर, प्रसंजय साळवे**........................................ 172

43 प्रादेशिक असमतोल कारणे आणि उपाय
**प्रा. खुणे जिवक आण्णासाहेब**........................................ 181

44 महाराष्ट्रातील असंघटित क्षेत्रातील कामगार आणि रोजगार हमी योजना
**दिपक बबनराव शिंदे, डॉ. व्ही. बी. खंडारे**........................................ 185

45 भटक्याविमुक्तांच्या कवितेची भाषा
**डॉ. ललिता मानसिंग गोपाळ**........................................ 189

46 श्री. संत ज्ञानेश्वर माऊलींच्या आषाढी वारी सोहळ्यातील व्यवसायिकांना
मिळणाऱ्या आर्थिक लाभाचा आढवा
**अशोक उद्धवराव भैरट**........................................ 195

47 'मधु सावंत' यांच्या कथेतील राजकीय चित्रण विशेष संदर्भ - 'तिची वाटच वेगळी'
**डॉ. सविता बालासाहेब कदम**........................................ 200

# पीकविमाबाबत शेतकऱ्यांमध्ये जागरूकता औरंगाबाद जिल्हा विशेष संदर्भ खुलताबाद तालुका

अमोल वसंतराव खंडागळे
डॉ. सुनिल अण्णा गोरडे

- अर्थशास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद सहायक प्राध्यापक
- अर्थशास्त्र विभाग, शिवाजी आर्टस, कामर्स आणि विज्ञान महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद

**सारांशः**

भारत हा कृषिप्रधान देश असून ग्रामिण लोकांचे जीवनमान हे प्रामुख्याने शेती क्षेत्रावर अवलंबून असून, कृषी क्षेत्राचे स्वरुप हे नैसर्गिक स्थितीवर अवलंबून आहे. कृषी क्षेत्रामध्ये बऱ्याच प्रमाणात स्थित्यंतरे आढळून येतात. पीक लागवडी पासून ते पीक काढणी व कापणी पश्चात साठवणूक व विक्री पर्यंत असे भरपूर अडथळे या क्षेत्रामध्ये दिसून येतात.

आसमानी व सुलतानी अशा दोन्ही प्रकारची संकटे ही कृषी क्षेत्रामध्ये दिसून येतात. आसमानी महापूर, दुष्काळ, अतिवृष्टी, अवर्षण सदृश्य परिस्थिती या बांबी मोडतात तर सुलतानी परिस्थितीमध्ये पिकांना हमी भावाची कमतरता, बाजरपेठेतील दलालामार्फत पिळवणूक इ. होय. यामळे कृषी क्षेत्र हे हातघाईला आलेले दिसून येत आहे.

आसमानी व सुलतानी संकटापासून शेतकऱ्यांचे संरक्षण करण्याकरिता पीक विमा हा शेतकऱ्यांना रामबाण उपाय म्हणून शासन राबवित आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील शेतकरी हे नैसर्गिक आपत्तीचा सामना करताना दिसून येतात. ह्या करिता औरंगाबाद जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यातील पीक विमा अंमलबजावणी व पीक विमा बाबत जागरूकता जाणून घेणे गरजेचे आहे. त्याकरिता प्रस्तुत कृषी क्षेत्रातील कृषी विकास हा अभ्यासणे गरजेचे आहे. प्रस्तुत संशोधन शोधनिबंधाचा प्रमुख उद्देश हा खुलताबाद तालुक्यातील पीक विमाधारक गावातील लोकांची जागरूकता समजून घेणे हा आहे. पीक विमा द्वारे पीकांचे संरक्षण हे लहान व सिमांतिक शेतकऱ्यांच्या दृष्टीने फार महत्वपूर्ण आहे, त्याकरिता प्रस्तुत अभ्यास हा धोरणकर्ते व धोरण निर्मिते यांच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

**प्रस्तावनाः-**

भारतीय शेती हे पर्जन्यमानावर अवलंबून असून, पडणाऱ्या पावसाचे प्रमाण हे अत्यल्प दिसून येते. ज्यामुळे कृषी क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात धोका दिसून येतो. कृषी क्षेत्रातील नैसर्गिक संकटामुळे फार मोठ्या प्रमाणात उत्पादकतेमध्ये घट दिसून येते. कृषी क्षेत्रातील धोके व अनिश्चितता लक्षात घेता या क्षेत्राच्या संरक्षणाकरिता या क्षेत्रामध्ये भरघोस व ठोस अशा पीक विमा संरक्षणाची गरज आहे. ही गरज लक्षात घेता भारत सरकारने एक प्रयोग करुन पीक विमा क्षेत्रामध्ये विविध योजना अंमलात आणल्या आहेत. त्यामध्ये या बाबत -

पहिला दृष्टीकोन १९७२-१९७८
पायलट पीक विमा योजना १९७९-१९८४
सखोल पीक विमा योजना १९८५-१९९९
प्रायोगिक पीक विमा योजना १९९७-१९८८
आणि सद्यस्थिती मधील, राष्ट्रीय कृषी पीक विमा योजना १९९९-२०० हे आतापर्यंत चालू स्थितीमध्ये ही योजना अस्तित्वात आहे.

भारतातील कृषी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न हे प्रामुख्याने नैसर्गिक आपत्ता जसे की, दुष्काळ, महापूर, ढगफुटी, चक्रीवादळ, गारपीट, आग, पीक रोग, कीड आणि इतर बाबी या सर्वांमुळे प्रभावित होते. पर्यायाने या सर्वामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनामध्ये घट दिसून येते. या करीता हे नुकसान भरुन काढण्यासाठी पीक विमा एक रामबाण उपाय असून ज्याद्वारे शेतकऱ्याचे उत्पादन स्थिर आणि गुंतवणूक स्थिर राहते. तसेच पीक विमा फक्त शेतकऱ्याचे पीक संरक्षित करत नसून बाजारातील किंमतीतील चढ-उतारा पासून संरक्षण देते तसेच शेतकऱ्यांना कृषी मध्ये गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित करते.

**मुख्य घटक :-**

प्रधानमंत्री पीक विमा योजना, पीक विमा योजना बाबत जागृकता.

**संशोधनाची उद्दिष्टे:-**

१.प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा आढावा घेणे.

२.पीक विमा योजणे बाबत अभ्यास क्षेत्रातील शेतकऱ्यांची जागरूकता अभ्यासणे

३.अभ्यासावरुन आलेले निष्कर्ष व त्यातील उणीवांचा शोध घेऊन योग्य ती धोरण निश्चिती राबविणे.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत अभ्यास हा औरंगाबाद या जिल्ह्यातील (महाराष्ट्र) खुलताबाद तालुक्याशी निगडित आहे. या अभ्यासामध्ये तालुका सोयगाव, बाजर सांवगी, इंदापूर, ताजणापूर आणि किनगाव या पाच गावातून विमाधारक शेतकऱ्यांची निवड करुन माहिती संकलीत केली आहे. महिती संकलना करीता स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. माहित माहिती संकलनासाठी निवड केलेल्या शेतकऱ्यांमध्ये सीमांत तसेच लहान शेतकरी यांची निवड करण्यात आली आहे. द्वितीय माहिती ही पीक विमा संकेतस्थळे, महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल याद्वारे संकलित करण्यात आली आहे.

**अभ्यास क्षेत्राविषयी माहिता:-**

महाराष्ट्र राज्यातील जवळजवळ ५३ टक्के लोकसंख्या ही उपजिविकेसाठी कृषी व संकलन क्षेत्र यावर अवलंबून असून या क्षेत्रामध्ये मागील काही वर्षात बरेच बदल झालेले दिसून येतात. अनिश्चित पाऊस, हवामानातील बदल, कमी होत असलेले विहित क्षेत्र, बाजरभाव अनिश्चितता यामुळे तोट्यात जाणारा शेती व्यवसाय या बाबी कृषी क्षेत्रासाठी महत्वाच्या आहेत. महाराष्ट्रातील मराठवाडा विभागामधील औरंगाबाद हा जिल्हा असून या जिल्ह्यामध्ये ०९ तालुके असून, त्यामध्ये खुलताबाद हा एक तालुक असून या तालुक्या अंतर्गत येणारी गावे येसगाव, बाजारसांवगी, इंदापूर, ताजणापूर, किनगाव ही प्रमुख गावे असून, या गावात सुध्दा मोठ्या प्रमाणात लोक हे उपजिविकेसाठी कृषी वर अवलंबून असून ते सुध्दा फार मोठ्या प्रमाणत पीक विमा या योजनेचा लाभ घेतांना दिसून येतात.

**प्रधानमंत्री पीक विमा योजना:**

खरीप हंगाम २००५ पासून अधिसुचित केलेल्या पीकांचे नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोग नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण व आर्थिक सहाय्य देण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेमध्ये अन्नधान्य तेलबिया, फळपीके आणि नगदी पीकांचा समावेश आहे. पूर्वीच्या राष्ट्रीय कृषी विमा योजनेचे या योजनेत एकत्रीकरण करण्यात आले आहे. सन २०१८-१९ मध्ये १४५.७८ लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले. एकून ४८.८१ लाख हेक्टर क्षेत्राच्या रु.२६,५८६,५६.४१ कोटी रकमेच्या विमासंरक्षण कोटी रु ९१६.४१ विमा हप्ता जमा करण्यात आला. एकूण ७२.९७ लाख लाभार्थी शेतक-यांसाठी रु ४.३०१,५३ कोटी रक्मेचे नुकसान भरपाई दावे करण्यात आले.

**माहितीचे विश्लेषण:-**

**पीक विमा बाबत शेतकऱ्यांमधील जागरूकता**

| अ. क्र. | जागरूकता | होय | नाही |
|---|---|---|---|
| १. | तुम्हाला पीक विमा या योजने बाबात माहिती आहे का? | ४८ | ०२ |
| २. | पीक विमा कसा घेतात या बाबत माहिती आहे का? | ४१ | ०९ |
| ३. | तुम्हाला कृषी विमा बाबत माहिती आहे का? | ३५ | १५ |
| ४. | पीक विमा योजनेच्या माहीती बाबत कार्यशाळा आयोजित करावी का? | ३० | २० |
| ५. | पीक विमा बाबत चर्चासत्रे आयोजित करावी का? | ३८ | १२ |
| ६. | विमा राष्ट्रीय कृषी विमा या अंतर्गत कोण-कोणती पिके संरक्षित केली जातात या बाबत माहिती आहे का? | ४५ | ०५ |

**स्त्रोत-** प्रत्यक्ष पाहणी

प्रस्तुत तक्त्यातील माहिती ही शेतकऱ्यांची पीकविमा या योजनेबाबतची माहिती व विमा योजनेविषयक जागरूकता दर्शविते. या माहितीवरून असे दिसून येते की, शेतकऱ्यांची पीकविमा बाबतची जागरूकता आणि पीकविमाबाबत त्यांनी मिळविलेले फायदे यामध्ये संबंध दिसून येतो.

त्याचे विश्लेषण पुढील प्रमाणे आहे.

१. वरील माहितीवरून असे दिसून येते की, जवळपास ४८ शेतकऱ्यांना पीकविमा या योजनेबाबत सखोल

अशी माहिती आहे. फक्त २ शेतकऱ्यांना याबाबत माहिती नाही. चर्चेअंती असे दिसून आले की, विमा वितरणाच्या बाबतीमध्ये विमा कंपनीची उदासीनता दिसून येते.

२. पीकविमा घेण्याबाबत शेतकऱ्यांकडून माहिती घेतली असता ४१ शेतकऱ्यांना याबाबत बिनचूक ज्ञान होते परंतु, ०९ शेतकरी हे सी.एस.के. केंद्राचे चालक यांच्यावर अवलंबून असलेले दिसून आले.

३. कृषी विमाबाबतची माहिती आहे का? असा प्रश्न केला असता ३५ शेतकऱ्यांना याबाबत परिपूर्ण माहिती दिसून आली. परंतु १५ शेतकऱ्यांच्या बाबतीत त्यांना कृषी संबंधित इतर विमा या बाबत ज्ञान असलेले दिसून आले नाही.

४. पीकविमा योजनेच्या जागरूकतेबाबत कार्यशाळा आयोजनाबाबत ३० शेतकऱ्यांनी सहमती दर्शविली, तर २० शेतकऱ्यांनी असहमती दर्शविली. त्यांच्या म्हणण्यानुसार ते याबाबत इतरांकडून सहज रीत्या माहिती उपलब्ध करून घेतात.

५. पीकविमा बाबत चर्चासत्रे आयोजन बाबत ३८ शेतकऱ्यांनी सहमती दर्शविली, कारण त्यांच्या मते त्यांना पिकांनुसार व हंगामनिहाय पिकांची पीकविमासाठी निवड करण्याकरिता मदत होते.

६. राष्ट्रीय कृषी विमा योजना या योजनेंतर्गत याबाबत जवळपास ४५ शेतकऱ्यांना माहिती असून तर ०५ शेतकऱ्यांना याबाबत माहिती नाही. कारण मुळात ते अशिक्षित असल्याने त्यांना याबाबत कोण-कोणती पिके येतात ही समजत नाही.

**निष्कर्ष: -**

१. मुळात पीकविमा योजना राबविणाऱ्या संस्था ह्या अकार्यक्षम असल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर दिसू येतो.

२. बऱ्याच प्रमाणात पीकविमा धारक व बिगर पीकविमा धारक यांना या योजनेबाबत माहिती असते. परंतु, या योजनेंतर्गत पीकविमा कसा मिळवावा याबाबत त्यांच्यामध्ये अज्ञान दिसून येते. तसेच विमा राबविणारी संस्था ही योजना राबविण्यात निष्क्रीय दिसून येते.

३. पीकविमा योजनेव्यतिरिक्त या तालुक्यातील शेतकरी हे जनावरांचा विमा, शेतकरी विमा, हवामान आधारित फळ, पीक विमा यांचा विमा भरताना दिसून येतात.

**समारोप: -**

आजच्या परिस्थितीमध्ये कृषी क्षेत्रामध्ये फार मोठ्या प्रमाणात बदल झालेला दिसून येतो. जसे की, सिंचन सुविधा, पायाभूत क्षेत्रामध्ये सुधारणा इ. परंतु, कृषी उत्पादनातील धोका हा शेतकऱ्यांच्या उत्पन्नावर व उत्पादनावर परिणाम करतो. यामुळे हा एक गंभीर प्रश्न बनला आहे. शेतकऱ्यांची पीक उत्पादनामधील जोखीम कमी करणे आणि त्यांच्या पिकांचे संरक्षण करून त्यांना पीकविमा योजनेबाबतचे फायदे समजून सांगून त्यांना विमा संरक्षण देणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


- Govt. of India, 'Economic Survey' various Issues.
- महाराष्ट्राची आर्थिक पाहणी
- जिल्हा आर्थिक समालोचन, औरंगाबाद जिल्हा
- Dandekar V. M. (1985), 'Crop Insurance in India,' A Review 1976-77 to 1984-85, Economic & Political Weekly, Vol.20, p.no.25-26
- Golait R. (2007), 'Current Issues in Agriculture Credit in India: A Assessment,' RBI Occasional Paper, 28-79-100.


◆◆◆